मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 11 फेब्रुवारी 2026

# स्वच्छ प्रशासनासाठी महापौर 'ॲक्शन मोड' वर!

## एकाच विभागात ठाण मांडून बसलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची तातडीने बदलीचे आदेश



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता, गतिमानता आणि शिस्त आणण्यासाठी नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांनी ठोस पावले उचलली आहेत. महापालिकेच्या विविध विभागांत दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तातडीने बदल्या करण्याचे आदेश महापौरांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिले आहेत.

महापौर रवी लांडगे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महापालिकेच्या आस्थापनेवरील अनेक अधिकारी आणि कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच विभागात किंवा एकाच पदावर कार्यरत आहेत. यामुळे स्थानिक पातळीवर हितसंबंध तयार होऊन प्रशासकीय कामकाजात 'अर्थपूर्ण वाटाघाटी' आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात आहे. ही बाब महापालिकेच्या प्रतिमेसाठी अत्यंत घातक असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्थापत्य, पर्यावरण, नगररचना, बांधकाम परवाना, आरोग्य, वैद्यकीय, करसंकलन, भांडार आणि उद्यान यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, मुख्य लिपिक, लेखापाल, भांडारपाल तसेच इतर अनेक कर्मचाऱ्यांच्या बदल्या दीर्घकाळ झालेल्या नाहीत. काही कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळूनही नियमानुसार दुसऱ्या विभागात बदली न होता, विभागप्रमुखांच्या मर्जीने तेच जुन्या विभागात कायम ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोपही महापौरांनी केला आहे. विभागप्रमुखांकडून आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना सोडण्यास होणारा विरोध आणि प्रशासनाकडून या विषयाकडे झालेले दुर्लक्ष याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. नागरिकांची कामे रखडत असून पारदर्शकतेला हरताळ फासला जात असल्याचे महापौर लांडगे यांनी ठणकावून सांगितले.

यामुळे एकाच विभागात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीने इतरत्र बदली करून प्रशासनात व्यापक फेरबदल करण्याचे स्पष्ट निर्देश महापौरांनी दिले आहेत. या विषयाचे गांभीर्य ओळखून तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल महापौर कार्यालयास सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी आयुक्तांना दिल्या आहेत. महापौर रवी लांडगे यांच्या या निर्णायक भूमिकेमुळे महापालिकेतील 'कम्फर्ट झोन'मध्ये असलेल्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून, प्रशासनात शिस्त आणि पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

> महापालिका ही नागरिकांची सेवा करणारी संस्था आहे; अधिकारी आणि कर्मचारी कुठे किती काळ कार्यरत आहेत यावर निर्भर न राहता, प्रत्येक विभागात पारदर्शकता आणि गतिमानता असावी. आमचा उद्देश प्रत्येक नागरिकाची कामे वेळेत पारदर्शकपणे पूर्ण व्हावीत, यासाठी आम्ही कठोर पण न्याय्य पावले उचलत आहोत.
>
> - रवी लांडगे, महापौर,
> पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

## प्रशासन काळातील मोठ्या प्रकल्पांची चौकशी करा; विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेत प्रशासन काळात झालेल्या मोठ्या प्रकल्पांची प्राधान्याने चौकशी करावी. ५० हजार नागरिकांच्या हरकती येत असतील तर डीपी रद्द करावा. रस्ते लहान करणारा हरित सेतू प्रकल्प रद्द करा. प्रशासनाने अनधिकृत बांधकाम थांबवण्यासाठी, पाणी गळती आणि चोरी रोखण्यासाठी काय केले याची माहिती द्या.

या मागण्यांसह महापौर रवी लांडगे यांनी पाणी पुरवठा २४ तास सुरू करू असे सांगितले आहे. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. मी विरोधी पक्षनेता असलो तरी विरोधाला विरोध करणार नाही. तर सत्ताधारी आणि विरोधक, नागरिक यांच्यामध्ये समन्वयक म्हणून काम करणार असल्याचे पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले. सोमवारी, मनपा कार्यालयात भोईर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

यावेळी भोईर म्हणाले की, आम्ही राज्य सरकार मध्ये महायुतीत सत्तेत आहोत. परंतु येथे विरोधक म्हणून सत्ताधाऱ्यांशी समन्वय साधून शहर विकासासाठी काम करणार आहे. काही अधिकारी निविदा प्रक्रिया विशिष्ट ठेकेदारांना समोर ठेऊन अटी, शर्ती ठरवतात. अनेक अधिकारी तर मनपाचे मालक झालो आहोत अशा आविर्भावात आहेत. शहरात अनेक भागात अजूनही टँकर ने पाणी घ्यावे लागते याला जबाबदार कोण ? अनेक निविदा वाढवून तिजोरीची लूट सुरू आहे. कालांतराने कामगारांच्या पगारासाठी राज्य सरकार वर अवलंबून रहावे लागेल. मनपाची आर्थिक घडी पुन्हा बसवावी लागेल. प्रशासन काळात झालेल्या सर्व बेकायदेशीर कामांची चौकशी करण्यात येईल.

हॉकर झोनचा प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवावा लागेल. तलाठी, सर्कल ऑफिस, तहसीलदार ऑफिस, पोलिस स्टेशन, पोलिस आयुक्तालय अशा या शहराच्या हद्दीत असणाऱ्या सर्व शासकीय, निमशासकीय, केंद्र सरकारच्या कार्यालयांवर मनपा चा अंकुश पाहिजे. याठिकाणी नागरिकांची कामे वेळेत झाली पाहिजेत. कायदा सुव्यवस्था सुरळीत झाली पाहिजे. नदी सुधार योजनेच्या ऐवजी नद्यांची गटारं झाली आहेत. पर्यावरणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे प्रदूषणात वाढ झाली आहे. राज्यकर्त्यांनी भानावर येण्याची गरज आहे. आता चुकीच्या कामावर लक्ष ठेऊन सक्षम विरोधी पक्षनेते म्हणून काम करणार असल्याची ग्वाही विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी दिली.

# चिखलीतील कै. गजानन म्हेत्रे उद्यानाची दुरवस्था

## प्रशासकीय अनास्थेमुळे नागरिकांचे आरोग्य आणि विरंगुळा धोक्यात

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा वेगाने विस्तार होत असतानाच, दुसरीकडे महापालिकेच्या अखत्यारीत असलेल्या सार्वजनिक मालमत्तांची कशी दुरवस्था होते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे चिखलीतील प्रभाग क्रमांक १ मधील कै. गजानन म्हेत्रे उद्यान व क्रीडांगण ठरत आहे. एकेकाळी परिसरातील नागरिकांच्या विरंगुळ्याचे आणि खेळाडूंच्या सरावाचे मुख्य केंद्र असलेले हे उद्यान आज प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून देखभालीचा अभाव आणि विकासकामे ठप्प असल्याने या परिसराला अक्षरशः अवकळा प्राप्त झाली असून, प्रशासनाविरोधात स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

सध्या या उद्यानाची स्थिती अत्यंत दयनीय झाली असून, कधीकाळी हिरवाईने नटलेल्या या जागेत आता गवताचा पत्ता उरलेला नाही; त्याऐवजी सगळीकडे वाळलेली झुडपे आणि कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. उद्यानातील मुलांसाठी असलेली खेळणी गंजलेली आणि मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत, ज्यामुळे लहान मुलांना खेळताना दुखापत होण्याची भीती पालकांना सतावत आहे. व्यायामासाठी बसवलेली साधनेही निखळली असून, ती केवळ नावापुरतीच उरली आहेत. याचा सर्वाधिक फटका सकाळी आणि संध्याकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना तसेच सरावासाठी मैदानावर अवलंबून असलेल्या तरुण खेळाडूंना बसत आहे. घाणीचे साम्राज्य आणि तुटलेल्या भिंतींमुळे या ठिकाणी असामाजिक तत्वांचा वावरही वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.





> चिखलीतील नागरिकांना दर्जेदार सोयीसुविधा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. या उद्यानाच्या दुरवस्थेबाबत मी महापालिका आयुक्तांकडे लेखी निवेदन देऊन अद्ययावत नूतनीकरणाची आग्रही मागणी केली आहे. प्रशासनाने केवळ आश्वासने न देता तातडीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अन्यथा नागरिकांच्या हितासाठी तीव्र पाठपुरावा केला जाईल.
>
> **- यश दत्ता (काका) साने, नगरसेवक.**

> या उद्यानाच्या दुरवस्थेबाबतची सर्व माहिती घेतली जाईल. त्याअनुषंगाने लवकरात लवकर यावर निर्णय घेण्यात येईल. संबंधित समस्या मार्गी लावल्या जातील.
>
> **- महेश गारगोटे, मुख्य उद्यान अधीक्षक.**

> या उद्यानाची अवस्था अत्यंत बिकट झाली असून तिथे कायम घाणीचे साम्राज्य असते. उद्यानात स्वच्छता असणे आणि मोडकळीस आलेली खेळणी व व्यायाम उपकरणे तातडीने दुरुस्त करणे गरजेचे आहे. प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याशी खेळू नये आणि तातडीने याकडे लक्ष द्यावे.
>
> **- विजय पाल, स्थानिक नागरिक.**



# ‘डिझाइन इन्स्टाग्रामसाठी नव्हे, इतिहासासाठी असावे’; आमदार अमित गोरखे

**पिंपरी | प्रतिनीधी**

वास्तुकला म्हणजे केवळ विटा, सिमेंट आणि स्टीलची रचना नसून, ती मानवी वर्तन, भावना आणि विचारांवर खोल परिणाम करणारी कला आहे. आजच्या तरुण पिढीने जागतिक डिझाइन्सची आंधळी नक्कल न करता भारतीय संस्कृती, हवामान आणि मानवी संवेदनशीलतेचा विचार करून भविष्यातील भारताचा पाया रचावा. डिझाइन केवळ इन्स्टाग्रामवर झळकण्यासाठी नव्हे, तर इतिहासात नोंदवले जाईल अशा दर्जाचे असावे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे आमदार अमित गणपत गोरखे यांनी केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या प्रतिष्ठित फर्ग्युसन कॉलेजमध्ये आयोजित ‘ELEVATION 2026’ या उपक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्गासह मोठ्या संख्येने भावी आर्किटेक्ट्स व इंटीरियर डिझायनर्स उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आमदार गोरखे म्हणाले की, देशाची प्रगती केवळ जीडीपीसारख्या आकड्यांतून मोजता येत नाही, ती प्रत्यक्ष अनुभवातून दिसून येते. देशाची ओळख त्याच्या वास्तूंमधून होते. ताजमहाल, संसद भवन किंवा अजिंठा-वेरूळच्या लेण्या आजही आपल्याशी संवाद साधतात. आपल्या पूर्वजांनी वास्तुकलेला केवळ व्यवसाय न मानता ‘धर्मा’प्रमाणे पवित्र मानले. त्यांनी निसर्गाशी संघर्ष न करता निसर्गाशी संवाद साधला; हेच तत्वज्ञान आजच्या वास्तुविशारदांनी आत्मसात करणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.



**इंटीरियर डिझाइन म्हणजे वास्तूचा आत्मा**

इंटीरियर डिझाइनच्या महत्त्वावर भाष्य करताना आमदार गोरखे म्हणाले की, आर्किटेक्ट इमारतीचे शरीर उभे करतो, तर इंटीरियर डिझायनर त्यात आत्मा फुंकतो. प्रकाश, ध्वनी, स्पर्श आणि रंग यांचे संतुलन म्हणजे खरे डिझाइन होय. एक शाळा विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करू शकते, तर एक रुग्णालय रुग्णाला आशा देऊ शकते; ही ताकद डिझाइनमध्ये असते. विदेशी मासिकांची नक्कल करण्यापेक्षा भारतीय जीवनशैलीचा आदर करणारी डिझाइन्स निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

### शॉर्ट-कट आर्किटेक्चरवर टीका

» सध्याच्या काळात बजेट आणि वेळेच्या मर्यादांमुळे वाढणारे ‘शॉर्ट-कट आर्किटेक्चर’ भविष्यात गंभीर समस्या निर्माण करू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. केवळ ‘स्मार्ट सिटीज’ नव्हे, तर माणसाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या ‘सेन्सेटिव्ह सिटीज’ची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. बी. व्ही. दोशी आणि चार्ल्स कोरिया यांनी घालून दिलेल्या आदर्शांप्रमाणे गरिबांनाही वास्तूतून प्रतिष्ठा मिळायला हवी, असे ते म्हणाले.

### ‘विकसित भारताचा पाया तुमच्या हातात’

» २०४७ चा विकसित भारत केवळ भाषणांतून साकार होणार नाही, तर तो भक्कम पायावर उभा राहील. त्या पायाभरणीची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे. तुम्ही केवळ इमारती उभारणार नाही, तर भारताची समृद्ध संस्कृती घडवणार आहात, अशा शब्दांत आमदार गोरखे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

# म्हाडा पुणे मंडळ ४१८६ घरांची सोडत

## सोडतीमधील अयशस्वी आणि इच्छुकांसाठी आनंदवार्ता; पुण्यातील घरांसाठी लवकरच सोडत

**पुणे | प्रतिनीधी**

म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ४,१८६ घरांसाठी मंगळवारी दुपारी सोडतीचा कार्यक्रम पार पडला. या सोडतीत दोन लाख १५ हजारांहून अधिक अर्जदार सहभागी झाले होते. मात्र घरांची संख्या ४,१८६ इतकी असल्याने दोन लाख १० हजारांहून अधिक अर्जदार अयशस्वी ठरेल. अयशस्वी अर्जदारांनी किंवा या सोडतीत कोणत्याही कारणाने अर्ज करू न शकलेल्या इच्छुकांनी नाराज होण्याची गरज नाही. कारण म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे लवकरच पुण्यातील घरांसाठी नवीन सोडत काढण्यात येणार आहे.

पुणे मंडळाने मंगळवारी याबाबतची घोषणा केली. मार्चमध्ये सोडतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार असून एप्रिल-मेमध्ये सोडत काढण्यात येणार आहे.

पुणे मंडळाला २० टक्के सर्वसमावेशक योजनेसह १५ टक्के एकात्मिक योजनेअंतर्गत ४,१८६ घरे उपलब्ध झाली होती. या घरांसाठी सप्टेंबर २०२५ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृतीला सुरुवात करण्यात आली होती. मात्र तांत्रिक अडचणी, सोडतपूर्व प्रक्रियेला मुदतवाढ आणि आचारसंहिता या कारणामुळे ही सोडत नोव्हेंबरपासून रखडली होती. पण अखेर मंगळवारी सोडत पार पडली. पुण्यातील जिल्हा परिषदेच्या शरदचंद्र पवार सभागृहात दुपारी १२ वाजता पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते सोडत काढण्यात आली.




म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे मुंबईतून दुरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरसिंग) या सोडतीत सहभागी झाले होते. या सोडतीत दोन लाख १५ हजारांहून अधिक अर्जदार सहभागी झाले होते. मात्र सोडतीसाठी केवळ ४,१८६ घरे उपलब्ध असल्याने मोठ्या संख्येने अर्जदारांचा भ्रमनिरास झाला. दोन लाख १० हजारांहून अधिक अर्जदार अयशस्वी ठरले आहेत. मात्र या अर्जदारांनी नाराज होण्याची गरज नाही. कारण त्यांना लवकरच सोडतीत सहभागी होऊन आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

पुण्यातील घरांसाठी नवीन सोडत काढण्यात येणार असल्याचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी जाहीर केले. मार्चमध्ये सोडतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू होईल. त्यानंतर एप्रिल-मेमध्ये सोडत काढली जाईल. ही सोडत नेमकी किती घरांसाठी असेल, कोणत्या ठिकाणची घरे यात असतील हे अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. मात्र लवकरच याबाबतची सर्व माहिती उपलब्ध होईल, असे म्हाडाकडून सांगण्यात आले.

## महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे अधिक कडक व प्रभावी करावेत; उपसभापती

**पुणे | प्रतिनीधी**

महिलांवरील अत्याचार, छळ आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे अंमलात आणणे आवश्यक आहे, असे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी आणि पोलीस विभागाच्या भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांची एकत्रित जिल्हा व तालुका तर शहरात झोन निहाय समन्वय बैठका घेण्यात याव्यात अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.



विधानभवनात आयोजित उच्चस्तरीय बैठकीत कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अधिक परिणामकारक करण्याबाबत, शक्ती विधेयकाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरविण्याबाबत तसेच अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयातील सुधारणा याचिकेवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीएनएसप्रमाणे कार्यप्रणालीत ३५ अ ते आय या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी पोलिसांनी केल्यास पिडीतांना दिलासा मिळेल म्हणुन पोलिसांनी योग्य ती कार्यप्रणाली तयार करावी अशाही सूचना उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिल्या . पुढील एका महिन्यात या सर्व बाबतीत पाठपुरावा करून संबंधित विभागांनी तपशील ठरवावा असेही सुचवण्यात आले. या बैठकीचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचेकडे पाठविण्यात येणार असल्याचे नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले.

या बैठकीस पोलीस महासंचालक सदानंद दाते, अपर पोलीस अधीक्षक अश्वती दोरजे, माजी न्यायमूर्ती साधना जाधव, महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे, उपसचिव डॉ. जयंत सरोदे, विधि व न्याय विभागाचे उपसचिव सागर बोन्द्रे, गृह विभागाचे अवर सचिव जयसेन इंगोले उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे यांनी बैठकीदरम्यान नमूद केले की, महिलांचा आत्मसन्मान, सन्मान आणि सुरक्षितता यासाठी राज्य यंत्रणांनी समन्वयाने आणि संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये महिलांचा बळी जाणार नाही, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे राबविणे आवश्यक आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, महिलांना तातडीने न्याय मिळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा अधिक सजग आणि संवेदनशील बनविणे अत्यावश्यक आहे. पोलीस विभाग आणि महिला व बाल विकास विभागाने संयुक्तरित्या कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी जिल्हास्तरावर करावी. जिल्हास्तरीय महिला दक्षता समित्यांच्या कार्याचा नियमित आढावा घेऊन त्यांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.

पीडित महिलांना तातडीने संरक्षण आदेश मिळवून देणे, पोटगी मिळविण्याच्या प्रक्रियेत होणारा विलंब टाळणे, तसेच महिलांना कायदेशीर सल्ला मिळण्यासाठी जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाशी समन्वय वाढवणे या बाबींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच ज्येष्ठ सेवा तक्रार प्राधिकरणाबाबत अभ्यास करून अहवाल सादर करावा, अशी सूचनाही डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर, अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयात सुधारणा याचिका दाखल करण्याबाबत कायदेशीर चाचपणी सुरू असून त्यावर चर्चा बैठकीत झाली.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी सांगितले की, महिलांवरील अत्याचार हा समाजाच्या मनोवृत्तीशी निगडित गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे फक्त कायदे कठोर करणे पुरेसे नाही, तर त्यांची अंमलबजावणी ही पारदर्शक, संवेदनशील आणि परिणामकारक असावी. महिलांचे सक्षमीकरण, न्यायप्राप्ती आणि सुरक्षिततेसाठी शासनाने एकत्रित प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

# पत्रके टाकणारा कार्यकर्ता ते पुण्याचे उपमहापौर!

## आंदोलन, तुरुंगवास आणि सामाजिक लढ्यातून उपमहापौरपदापर्यंतची वाटचाल

**पुणे | प्रतिनीधी**

महापालिकेच्या प्रेक्षक गॅलरीतून पत्रके टाकणारा कार्यकर्ता ते उपमहापौर असा उपमहापौरपदी बिनविरोध निवड झालेल्या परशुराम वाडेकर यांचा प्रवास आहे. महापालिकेच्या उपमहापौर पदावर वाडेकर विराजमान झाले. नगरसेवक म्हणून निवडून आलेले वाडेकर हे पहिल्याच प्रयत्नात उपमहापौर झाले आहेत.

चळवळीतील कार्यकर्ता अशी सुरुवात असलेल्या परशुराम बाळकृष्ण वाडेकर यांचा उपमहापौरपदापर्यंतचा प्रवास जिद्दीचा आहे. बोपोडी येथे १ फेब्रुवारी १९६८ रोजी त्यांचा जन्म झाला. दापोडी येथील सिद्धार्थनगर येथे अतिशय हलाखीत त्यांचे बालपण गेले. आई लक्ष्मीबाई आणि वडील बाळकृष्ण शिवराम वाडेकर यांच्याकडून सामाजिक जाणीव आणि लढाऊ वृत्ती त्यांच्यात रुजली.

विद्यार्थिदशेपासूनच वाडेकर यांनी संघर्ष करून सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला. मराठवाडा विद्यापीठाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या नामांतर आंदोलनात त्यांनी भाग घेतला आणि त्यासाठी तुरुंगवासही भोगला आहे. याच काळातच आंबेडकरी विचारसरणीशी त्यांची नाळ घट्ट जोडली गेली. महापालिकेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना विविध प्रश्नांवर त्यांनी महापालिकेत आंदोलनेदेखील केली होती. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रेक्षक गॅलरीतून निषेधाची, सत्ताधाऱ्यांच्या धिक्काराची पत्रके टाकून आंदोलनेही वाडेकर यांनी केली होती.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या माध्यमातून फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीत ते सक्रिय झाले. २००२ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री चंद्रकांत छाजेड यांच्या विरोधात निवडणूक लढवित त्यांनी राजकीय वाटचाल अधिक ठळक केली. त्यानंतर सलग तीन विधानसभा निवडणुका लढवून त्यांनी बोपोडी आणि त्यानंतर शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात आपली ओळख निर्माण केली.




पुण्यात महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली भिडेवाड्यातील पहिली मुलींची शाळा या स्थळाला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळावा, यासाठी पुरोगामी संघटनांसह त्यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. सामाजिक प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणे हे त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य राहिले आहे. शिक्षण, सामाजिक न्याय आणि ऐतिहासिक वारसा जपण्याच्या मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला.

पुणे महानगरपालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी सुनीता परशुराम वाडेकर यांनी प्रभाग क्रमांक ८ (बोपोडी–औंध) मधून सर्वाधिक मताधिक्याने विजय मिळविला. भाजप-आरपीआय युतीच्या माध्यमातून लढविण्यात आलेल्या या निवडणुकीनंतर पहिल्याच वर्षी त्यांच्या पत्नी सुनीता यांना उपमहापौरपदावर संधी देखील देण्यात आली. त्यांच्या या विजयामुळे वाडेकर कुटुंबाचा महापालिकेतील प्रभाव अधिक दृढ झाला.

महानगरपालिका २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीत परशुराम वाडेकर यांनी प्रभाग क्र. ८ बोपोडी येथून विजय मिळवत पहिल्याच प्रयत्नात उपमहापौरपदाची संधी साधली. चळवळीतील कार्यकर्त्यापासून महापालिकेच्या सत्ताकेंद्रापर्यंतचा हा प्रवास आंबेडकरी विचारसरणी, सामाजिक बांधिलकी आणि सातत्यपूर्ण संघर्ष यांची साक्ष देणारा ठरला आहे.

उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले, पुणे महापालिकेच्या जुन्या सभागृहात कधीकाळी सर्वसाधारण सभेमध्ये प्रेक्षक गॅलरीतून पत्रके टाकणारा एक कार्यकर्ता अशी ओळख होती. कधी तरी आपणच या सभागृहात निवडून येऊन उपमहापौरपदी विराजमान होऊ, असे स्वप्नातही वाटले नव्हते.

# बोपदेव घाटात बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पुणे | प्रतिनीधी**

बोपदेव घाटात प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. भरधाव बसने एका मोटारीला धडक दिली. अपघातात मोटार चालकासह त्याचे कुटुंबीय किरकोळ जखमी झाले.

अभिषेक अर्जुन मोरे (रा. कॉसमॉस सोसायटी, ताथवडे) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी खासगी बस चालक बंदगीशहा खादीर मुलाणी (वय ५०, रा. मुलाणी गल्ली, मंगळवेढा, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भगवान रत्नाकर पाटील (वय ५४, रा. उदयनगर, माळशिरस, जि. सोलापूर) यांनी येवलेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटार चालक पाटील हे कुटुंबीयांसोबत ८ फेब्रुवारी रोजी दुपारी चारच्या सुमारास मूळगावी निघाले होते.




बोपदेव घाटात कांचन हॉटेलजवळ प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसने मोटारीला धडक दिली. त्यानंतर तेथून निघालेले दुचाकीस्वार अभिषेक मोरे यांना धडक दिली. अपघातात मोटार चालक पाटील आणि कुटुंबीयांना दुखापत झाली. अपघातात गंभीर झालेल्या मोरे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर खासगी बस चालक याला ताब्यात घेण्यात आले. त्याला पोलिसांनी नोटीस बजावली. सहायक पोलीस निरीक्षक विनायक गुरव तपास करत आहेत.

शहरात गंभीर स्वरुपाचे अपघातात वाढ झाली आहे. बहुतांश अपघात भरधाव वेग आणि ट्रक, बस, डंपर, सिमेंट मिक्सर अशा अवजड वाहन चालकांच्या बेदकारपणामुळे झाले आहेत. अपघात करणारी जड वाहने जप्त करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नुकतेच दिले. वाहन मालकासह चालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### एसटी बसच्या धडकेत एकाचा मृत्यू

» नगर रस्त्यावरील वाघोली परिसरात एसटी बसच्या धडकेत पादचारी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी एसटी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सिद्धार्थ एकनाथ कांबळे असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. याबाबत सविता कोंडीराम कांबळे (वय २६, रा. पाचंगे वस्ती, शिरुर, जि. पुणे) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ कांबळे हे ८ फेब्रुवारी रोजी रात्री पावणेनऊच्या सुमारास नगर रस्त्यावरुन निघाले होते. वाघोलीतील कटकेवाडी परिसरात भरधाव एसटी बसने कांबळे यांना धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले. पोलीस उपनिरीक्षक पालवे तपास करत आहेत.